आर.सी.एस क्र. ०८/२०२३
उत्तम वि. शुभा
नि.क्र.१५ चा भाग

**वादीतर्फे साक्षीदार क्र.०१ चा उलटतपास**
देवाची शपथ खरे सांगतो

नाव -उत्तम झामाजी भुडे.

**उलटतपास शपथेवर प्रतिवादी तर्फे श्री एस.एम.पिंपळकर यांच्या मार्फत सुरू.**

**१७.** राजाराम गणु भुडे हे माझे आजोबा होते ते मयत झालेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादातीत मिळकत ही राजाराम गणु भुडे यांची होती. हे म्हणणे खरे आहे की, वादमिळकतीची अधीकार अभिलेख पंजी नि.क्र.२३ मध्ये राजाराम गणु भुडे यांचे एकट्याचे नाव आहे त्यामुळे ते सदर मिळकतीचे एकटे मालक होते. राजाराम गणु भुडे यांना झामा नावाचा मुलगा होता व ते माझे वडील होते. झामाजी मयत झालेले आहे. अधिकार अभिलेख पंजीमध्ये जे जुने नंबर उल्लेखित आहे तेच वर्तमानमान प्रचलित दाव्यातील सर्व्हे नंबर आहेत. साक्षीदार स्वत:हुन सांगतो की, नव्याने बदलले असु शकतात. हे म्हणणे खरे आहे की, अधिकार अभिलेख पंजीमध्ये जे जुने सर्व्हे नंबर होते ते बदलुन नव्याने सर्व्हे नंबर सदर दाव्यामध्ये उल्लेख केलेले आहे.

**१८.** हे म्हणणे खरे आहे की, माझे आजोबा राजाराम गणु भुडे यांनी मृत्युपत्र केले होते. हे म्हणणे खरे आहे की, सदर मृत्यूपत्राप्रमाणे फेरफार झाला होता तो फेरफार मी नि.क्र.२२ वर दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, राजाराम भुडे यांचे रघुनाथ, मी उत्तम व पुरूषोत्तम हे तीन नातु आहेत. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.२२ प्रमाणे आम्हा तिन्ही नातवांच्या अनुषंगाने मृत्युपत्र राजाराम भुडे यांनी करून दिले होते. हे म्हणणे खरे आहे की, सदर मृत्यूपत्रान्वये आमच्या तिघांचे वेगवेगळे फेरफार झाले होते. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.२२ प्रमाणे रघुनाथ यांना जुने गट न.५३/१ व १०० मधील ३.०३ हे.आर. एवढी शेतजमीन मिळाली होती. हे म्हणणे खरे आहे की, मला सदर मृत्युपत्रान्वये जुने गट न.८४,१०४ अ.१ व ९७ मधील २.८० हे. आर जमिन ही मला मिळाली होती. तसेच पुरूषोत्तम माझा लहान भाऊ याला सदर मृत्यूपत्रान्वये जुने गट.न.५३/२,१०४ अ.२,१०४ ब मधील २.१५ हे.आर जमिन मिळाली होती. हे म्हणणे खरे आहे की, त्याप्रमाणे आमची वेगवेगळी वहीवाट सुरू होती.

**१९.** हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर महसूल विभागाच्या एकत्रिकरण योजनेमध्ये सर्व्हे नंबर ४७ वर रघुनाथ व पुरूषोत्तम यांची नावे संयुक्तपणे शेतजमिनीवर लागली. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर सर्व्हे नंबर ५० वर सुध्दा सदर योजनेअंतर्गत रघुनाथ व पुरूषोत्तम यांची नावे एकत्रित लागली. हे म्हणणे खरे आहे की, तद्नंतर रघुनाथ व पुरूषोत्तम यांनी सर्व्हे नंबर ४७ व ५० मधील शेतजमिनीची आपसात वाटणी करून घेतली होती. हे म्हणणे खरे आहे की, सदर वाटणी दस्त क्र.१५७५ अन्वये दिनांक ०६/०६/२०१७ रोजी करून घेतली होती व सदर दस्तऐवजाचे मी साक्षीदार म्हणुन आहे. आता मला सदर वाटणीपत्र दाखविण्यात आले त्यावर माझी सही आहे त्यातील मजकुर मला माहिती आहे तो खरा व बरोबर आहे त्यास **नि.क्र.३७** देण्यात आला. हे म्हणणे खरे आहे की, सदर वाटणीपत्रान्वये रघुनाथ झामाजी भुडे यांना सर्व्हे नंबर ४७ ची उत्तर-दक्षिण विभागणी करून पश्चिमेकडील ३.०० हे. आर. इतकी जमिन मिळाली होती व पुरूषोत्तम यांना सर्व्हे नंबर ४७ चा उर्वरित पुर्वेकडील भाग व सर्व्हे नंबर ५० मधील संपूर्ण शेतीचा भाग मिळाला होता. आता मला वाटणीपत्रातील मजकूर 'सदर वाटणीपत्रान्वये रघुनाथ यांच्या हिश्यावर आलेल्या शेतजमीनीच्या भागात विहीर असुन त्या विहीरीवर रघुनाथ भुडेचा अधिकार राहील तसेच पुरूषोत्तम भुडेचा अधिकार राहणार नाही किंवा पुरूषोत्तम भुडेच्या वाटणीत आलेली शेती ओलीताकरिता सदर विहीरीचे पाणी वापरता येणार नाही' असा जो मजकूर वाटणीपत्रामध्ये लिहीलेला आहे तो खरा व बरोबर आहे.

**२०.** हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.३७ प्रमाणे मला रघुनाथ यांच्या हिश्यावर आलेल्या विहीरीवर पाणी भरण्याचा अधिकार आहे ही बाब सदर वाटणीपत्रामध्ये लिहीलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या मालकीची शेती सर्व्हे नं.१०८ व ४८ मधील स्थित आहे. हे म्हणणे खरे आहे की, दि.०९/१०/२०१४ रोजी मी सदर जमीनी सर्व्हे नं.१०८ व ४८ यांची मोजणी केलेली आहे. आता मला दि.०९/१०/२०१४ रोजीचा मोजणी मामला क्र.२१२/१४ सर्व्हे नंबर १०८ व ४८ च्या मोजणीची क प्रत दाखविण्यात आली ती मोजणी मीच करूण घेतलेली आहे. साक्षीदार स्वत:हुन सांगतो की, त्यावेळी शेती एकत्रित होती. हे म्हणणे खरे आहे की, सदर मोजणीच्या क शीटमध्ये गट न.१०८ व ४८ हे वेगवेगळे दाखविलेले आहे व गट न.४७ हा वेगळा दाखविलेला आहे. सदर मोजणीच्या क शीटला **आर्टीकल अ** देण्यात आले.

**२१.** हे म्हणणे खरे आहे की, त्याच दिवशी मोजणी प्र.क्र.२१३ प्रमाणे माझा भाऊ रघुनाथ भुडे याने गट न.४७ ची मोजणी करूण घेतली होती. आता मला सदर मोजणीची क प्रत दाखविण्यात आली त्यामध्ये मी लगतधारक म्हणुन आहे. मोजणीच्या वेळी मी उपस्थित होतो व साक्षीदार म्हणुन मी सदर मोजणीच्या क शीटवर सही केलेली आहे. सदर मोजणीच्या क शीटला **आर्टीकल ब** देण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की, आर्टीकल ब मधील मोजणीच्या अनुषंगाने सर्व्हे नंबर ४७ मध्ये वादातीत विहीर दर्शविलेली आहे व सदर विहीर गट न.४७ च्या हद्दीत दाखविलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, आर्टीकल अ मधील मोजणीशीट मध्ये गट न.४८ च्या दक्षीणेला गट न.४७ मध्ये वादातीत विहीर दर्शविलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, मोजणीनुसार सदर वादातीत विहीर ही गट न.४७ च्या हद्दीत आहे. हे म्हणणे खरे आहे की, वाटणीपत्रान्वये सदर विहीर ही रघुनाथ याच्या हिश्यावर गेलेली असल्यामुळे सदर विहीरीवर रघुनाथ याचा अधिकार आहे. साक्षीदार स्वत:हुन सांगतो की, सदर विहीर ही वडीलोपार्जित आहे त्यामुळे जसा रघुनाथ याचा अर्धा अधिकार आहे तसा सदर विहीरीवर माझासुध्दा अर्धा अधीकार आहे.

**प्रश्न-**सदर वादातीत विहीर ही वडीलोपार्जित आहे हे दर्शविण्यासाठी तुम्ही कागदपत्र दाखल केले आहे काय?

**उत्तर-**होय. मी ७/१२ चा उतारा अभिलेखावर दाखल केलेला आहे, त्यामध्ये सदर विहीरीची नोंद आहे.

**प्रश्न-**तुमचा सदर वादातीत विहीरीवर पाणी भरण्याचा अर्धा अधिकार आहे हे दाखविण्यासाठी तुम्ही काही कागदपत्रे दाखल केले आहे काय?

**उत्तर-**माझ्या नावाचे विज कनेक्शन आहे.

**२२.** हे म्हणणे खरे आहे की, माझा व रघुनाथ याचा वादातीत विहीरीवर पाणी भरण्याचा अर्धा-अर्धा अधिकार आहे याबाबत कोणताही करारनामा झालेला नाही. आता मला नि.क्र.१६ व १७ वरिल गट क्र.४८ व १०८ चे ७/१२ चे उतारे दाखविण्यात आले त्यामध्ये विहीरीमुळे शेती ओलित असल्याबाबत नोंद नाही. मी नि.क्र.१६ व १७ वरिल ७/१२ चे उतारे दाखल केलेले आहे व त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे.

**२३.** आता मला नि.क्र.२० दाखविण्यात आला त्यामध्ये गट क्र.४७ मधील शेती

विहीरीने ओलीत व जलसिंचनाचे साधन विहीर असे दाखविलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, नि.क.२० प्रमाणे एकमेव गट क्र.४७ मधील शेती विहीरीने ओलीत असल्याचे दिसते.

**२४.** मी नि.क्र.२४ प्रमाणे विजबिल दाखल केलेले आहे ते थकित विजबील आहे व थकीत रक्कम रूपये ३८,७५०/- दर्शविते व सदर बिल हे दि.०७/०२/२०२२ रोजीचे आहे व ते अजुनही थकीत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर विजबिल थकीत असल्यामुळे विज कनेक्शन एम.एस.सी.बी.ने कापलेले आहे. सदर विज कनेक्शन चालु असल्याबाबत मी पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. मी नि.क्र.२४ वरिल विज कनेक्शन घेत असतांना विद्युत मंडळाला सर्व्हे नं.४८ च्या ७/१२ चा उतारा जोडलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, सर्व्हे नं.४८ चा उतारा जोडल्यानंतर मला सर्व्हे नंबर ४८ च्या विहीरीला विज कनेक्शन मिळाले. साक्षीदार स्वत:हुन सांगतो की, मी सर्व्हे नं.४८ व ४७ चा उतारा दिला होता. मी विज कनेक्शन घेतांना सर्व्हे नं.४७ व ४८ चा ७/१२ उतारा विद्युत मंडळाला दिला होता ते दाखविण्यासाठी मी पुरावा अभिलेखावर दाखल करू शकतो. नि.क्र.२४ मध्ये मी सर्व्हे नं.४७ मधील विहीरीचे सदर विज कनेक्शनद्वारे पाणी घेतो असा उल्लेख केलेला नाही. मी सदर विज कनेक्शन सन १९९९ मध्ये घेतलेले आहे.

**२५.** हे म्हणणे खरे नाही की, मी सदर विज कनेक्शन सर्व्हे नं.४७ मधील विहीरीवरून पाणी घेण्यासाठी घेतलेलेच नाही.

**प्रश्न-**तुमच्या दाव्यामध्ये सदर वादातीत विहीर ही सर्व्हे नं.४७ व सर्व्हे न.४८ च्या जोडधु-यावर होती असे लिहीलेले आहे तर सदर विहीर सन २०१४ च्या मोजणीमध्ये गट न.४७ च्या हद्दीत आहे असे लक्षात आले तर तुम्ही सन २०१४ पासुन ते २०२३ पर्यंत दावा दाखल करेपावेतो काही कारववाई का केली नाही?

**उत्तर-**त्यावेळेस शेती एकत्रित होती व विहीर ही वडील असतांनी खोदली होती.

**प्रश्न-**तुमच्या तिनही भावाची जमिन एकत्रित होती हे दाखविण्यासाठी तुम्ही ७/१२ दाखल केला आहे काय?

**उत्तर-**माझ्या आजोबांनी त्यावेळी वेगवेगळे ७/१२ करून दिले होते.

**प्रश्न-**ज्यावेळी सन २०१४ मध्ये शेतीची मोजणी केली त्यावेळी ७/१२ चे उतारे एकत्र होते काय?

**उत्तर-**नव्हते.

आता मला माझ्या शपथपत्रातील परिच्छेत क्र.०४ मधील संपूर्ण मजकूर वाचुन दाखविण्यात आला तो बरोबर आहे. रघुनाथ याने महसुल अधिकारी यांच्यासोबत संगणमत करून वाटणी केली हे दर्शविण्यासाठी मी अभिलेखावर पुरावा दाखल केलेला नाही कारण मला सदर वाटणीविषयी माहीतीच नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, माझा भाऊ रघनाथ याने महसुल अधिकारी यांच्यासोबत संगणमत करून वाटणी केली याबाबत मी माहिती मिळविली नव्हती व सदर माहिती न घेता मी मजकूर परिच्छेत क्र.०४ मधील शपथपत्रात लिहीलेला आहे.

**२६.** हे म्हणणे खरे नाही की, वादातीत विहीर कोरडी आहे. हे म्हणणे खरे आहे की, फेब्रुवारी व मार्च मध्ये सदर विहीरीत पाणी राहत नाही. माझे शपथपत्र नि.क्र.१५ मधील परिच्छेद क्र.०८ अन्वये मजकूर माझ्या वडीलांच्या निधनानंतर प्रतिवादी क्र.०२ याने हुकुमशाहीच्या अविर्भावात सर्व तिन भावंडामध्ये वाटणी करून वाटणीला आलेल्या शेतजमीनीची वाटणी व पोटहिस्सा मोजणी न करताच अंदाजानुसार प्रत्यक्ष आ.रा.जी. मोजणी भुमापन कार्यालयामार्फत न करता सिमा निर्धारित केल्या याबाबत मी कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. माझे आजोबा मयत झाल्यानंतर माझ्या वडीलांच्या नावाने शेतजमीनीचा ७/१२ झाला नव्हता. माझे वडील मयत झाल्यानंतर आमच्या तीनही भावांचा संयुक्त ७/१२ उतारा तयार झाला नव्हता.

**प्रश्न-** शेताचा संयुक्त ७/१२ तुमचे वडील मयत झाल्यानंतर तुमच्या तीन भावांच्या नावाने झाला नव्हता त्यामुळे तुम्हा तीन भावांमध्ये बटवारा झालाच नव्हता का?

**उत्तर-**त्यांचे गट वेगवेगळे होते.

हे म्हणणे खरे आहे की, आजोबानी केलेल्या मृत्यूपत्रानुसार सर्व्हे न.४८ व १०८ मधील जमीन माझ्या मालकीची आहे.

**प्रश्न-**वाटणीपत्रामध्ये तुम्ही वादातीत विहीरीवर तुमचा पाणी घेण्याचा अधिकार राहील असे लिहुन घ्या असे तुम्ही म्हटले होते काय?

**उत्तर-**म्हटले होते त्यांनी लिहीले नाही.

हे म्हणणे खरे आहे की, मी सांगुनही सदर वाटणीपत्रामध्ये मला पाणी घेण्याचा अधिकार लिहीलेला नसल्यामुळे मी त्याबाबत लेखी हरकत घेतली नव्हती. साक्षीदार स्वत:हुन सांगतो की, सदर विहीरीवरून पाणी घेण्यासाठी मला रघुनाथ याने तोंडी सांगितले होते.

२७.		हे म्हणणे खरे नाही की, मला रघुनाथ याने वादातीत विहीरीवरून पाणी घेण्याबाबत तोंडी कधीही सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, वादातीत विहीर ही वडीलोपार्जित नाही त्यामुळे सदर विहीरीवर मला पाणी भरण्याचा अधिकार नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर वादातील विहीरीवर फक्त रघुनाथ याचा व त्यानंतर त्याच्या पत्नीचा व मुलाचा पाणी भरण्याचा एकमेव अधिकार आहे. हे म्हणणे खरे नाही की, दाव्याअर्जी नकाशामध्ये विहीर ए,बी,सी,डी या अक्षराने दाखविलेली आहे त्याबाबत दावा नकाशा मी अभिलेखावर जोडलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, दाव्याअर्जी नकाशाच मी अभिलेखावर दाखल केलेला नाही त्यामुळे दाव्यामधील ए,बी,सी,डी, या अक्षराने दाखविलेल्या विहीरीबाबतचा मजकूर खोटा आहे.

**प्रश्न-**तुम्ही दाव्याअर्जी नकाशा कोणाकडुन काढला होता?

**उत्तर-**पटवा-याकडुन काढला होता.

आता मला अभिलेख दाखविण्यात आला त्यामध्ये पटवा-याकडुन काढलेला नकाशा अभिलेखावर दाखल केल्याचे दिसुन येत नाही. कोणत्या तारखेला कोणत्या पटवा-याने दावाअर्जी नकाशा काढला होता हे मला सांगता येत नाही.

**प्रश्न-**पुराव्याच्या शपथपत्रामध्ये दाव्याअर्जी नकाशा लावलेला आहे आसे नमुद केलेले आहे परंतु दाव्याअर्जी नकाशा अभिलेखावर लावलेला नाही हा मजकुर चुकीचा आहे काय?

**उत्तर-**नाही.

**पश्न-**तुम्ही दाव्यामध्ये लिहीलेले आहे की, तुम्ही दाव्यासोबत दाव्याअर्जी नकाशा लावलेला आहे परंतु, दाव्याअर्जी नकाशा अभिलेखावर लावलेला नाही त्यामूळे सदर मजकुर चुकीचा आहे काय?

**उत्तर-**दाव्याअर्जी नकाशा चुकीने लावलेला नसेल,जोडुन टाकू.

हे म्हणणे खरे नाही की, मी दाव्याअर्जी नकाशा काढलेला आहे हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी वादातीत विहीरीवरून कधीही पाणी घेतलेले नाही.

**प्रश्न-**तुम्ही पुर्वीपासुन वादातीत विहीरेचे पाणी घेत आले आहे याबाबत तुम्ही कागदोपत्री पुरावा दाखल केला आहे काय.

**उत्तर-**नाही.

२८.		हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे नोटीस प्रतिवादी यांना पाठविले होते. हे

म्हणणे खरे नाही की, मी खोटा दावा दाखल केला व खोटे शपथपत्र दाखल केले व खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला वादातीत विहीरीवर पाणी भरण्याचा अधिकार नाही ही बाब मला माहित असतांनासुध्दा मी प्रतिवादी यांना खर्चात पाडण्यासाठी खोटा दावा दाखल केला आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

वा.दा.ब.अ.सा.

समक्ष

(आर.एस.मानकर)
२रे सह.दि.न्यायाधीश क.स्तर उमरेड
दि ११.०३.२०२५

(आर.एस.मानकर)
२रे सह.दि.न्यायाधीश क.स्तर उमरेड